## अमेरिकेतील मराठी माणसांचे महाराष्ट्र फाउण्डेशन

सुनील देशमुख

महाराष्ट्र फाउण्डेशन ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्या निवारण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली एकोणतीस वर्षे करीत आहे.
श्री. सुनील देशमुख, कनेक्टिकट, यू.एस्. ए. यांच्या एक कोटी रुपयांच्या उदार देणगीमधून प्रगतिशील मराठी साहित्याला प्रोत्साहन देणारी, मराठी साहित्य व साहित्यिक यांच्यासाठी प्रतिवर्षी सुमारे दहा लक्ष रुपयांचा विनियोग करण्याची एक योजना १९९४ साली कार्यान्वित करण्यात आली. भारताच्या वैचारिक नेतृत्वात मराठी विचारवंतांचा व साहित्यकांचा सिंहाचा वाटा आहे. तेराव्या शतकातील संतसाहित्यापासून सुरु झालेली ही परंपरा आधुनिक काळात लोकहितवादी महात्मा फुले, महर्षी शिंदे, न्यायमूर्ती रानडे, टिळक, आगरकर, राजवाडे,कर्वे, आंबेडकर यासारख्या विचारवंतानी टिकविली आहे. ही समाजिक व प्रगतिशील वैचारिक परंपरा साहित्याच्या माध्यमातून अशीच पुढे चालू रहावी आणि तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घ्यावी, हा या योजनेमागील हेतू आहे.
पहिली चार वर्षे या उपक्रमाचे आयोजन मुंबईतील अभिनव भाषाभ्यास केंद्रामार्फत करण्यात आले होते. आता या उपक्रमाचे आयोजन 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' मार्फत करण्यात येते या आधी प्रा. दिगंबर पाध्ये हे या आयोजनाचे सूत्रधार होते. तर २००४ सालापासून श्री. सतीश काळसेकर यांनी सूत्रे स्वीकारली आहेत.

या उपक्रमातील गौरव पुरस्कार व ग्रंथ पुरस्कार यासाठी महाराष्ट्रातील विचारवंत, समीक्षक व चोखंदळ वाचक यांच्याकडून त्यांच्या पसंतीची नावे प्रथम मागविली जातात आलेल्या नावामधून पुरस्कारासाठी योग्य नांवाची शिफारस करण्याचे काम केशव गोरे स्मारक ट्रस्टने नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या समितीकडून केले जाते. महाराष्ट्रात केलेल्या शिफारशींरचा विचार करण्यासाठी अमेरिकेतही एक समिती नेमण्यात आली आहे व ही समिती भारतातील निवड समितींच्या शिफारशींच्या आधारे योग्य व्यक्ती, पुस्तके इत्यादींची पुरस्कारांसाठी निवड करते. एखाद्या वर्षात गौरव पुरस्कार, पारितोषिक वा अनुदाने यांच्यासाठी योग्य व्यक्ती वा पुस्तके नसल्यास त्या रकमेचे विनियोग भाषा, साहित्य व साहित्यिक यासाठी करावा, हे त्यावेळी ठरविण्यात येते.

### महाराष्ट्र फाऊंण्डेशन गौरव पुरस्कार :

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रात आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा गौरव करण्यासाठी दोन लक्ष रुपये आणि मानचिन्ह असा एक गौरव पुरस्कार दिला जातो. दरवर्षी ललित किंवा वैचारिक यापैकी एकाच विभागात पुरस्कार दिला जातो.
या गौरव पुरस्कारासाठी नावांचा विचार करताना खालील बाबीं विचारात घेतल्या जातात.

### ललित साहित्यिकांच्या संदर्भात :

* ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी, सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे.
* ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले गेले आहे. ज्याच्या साहित्यातून सार्वकालिक व सार्वजनिक मूल्यांचा आविष्कार झाला आहे.
* ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे व त्यामुळे ज्यांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले आहे.

अशा प्रतिभावंत साहित्यिकांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

वैचारिक साहित्याच्या संदर्भात :
* इतिहास, तत्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य संशोधन, समीक्षा, या सारख्या वैचारिक क्षेत्रात ज्यांच्या मराठी लेखनामुळे त्या विषयाच्या संदर्भात महत्वाची भर पडली आहे.
* त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यिकांनी निःस्पृहवृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
* ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे, मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्वाचे ठरणारे आहे. अशा विचारवंतांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

विशेष पुरस्कार :
महाराष्ट फाऊण्डेशन साहित्य पुरस्कार निवड समितीच्या असे निदर्शनास आले की काही साहित्यिकांचे वैशिष्ट्यपूर्ण व मोलाचे असे योगदान असूनही वेगवेगळ्या कारणांमुळे त्यांना पुरस्काराने गौरविण्याचे राहून जाते. यासाठी २००५ या वर्षापासून रु. ३०,००० व सन्मानचिन्ह अशा स्वरुपाच्या एका विशेष पुरस्काराची योजना करण्यात आली आहे. भारतातील निवड समिती या पुरस्कारासाठी साहित्यिकाच्या नावाची शिफारस करील.

**ग्रंथासाठी पुरस्कार :**
समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून सात मराठी ग्रंथांना प्रत्येकी रु. २५००० व सन्मानचिन्ह असे सात महाराष्ट्र फाऊण्डेशन ग्रंथ पुरस्कार या वर्षी दिले जात आहेत. या पुरस्कारांसाठी अर्ज करावे लागत नाहीत. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील दोन वर्षातील पुस्तकांचा या पुरस्कारांसाठी विचार केला जातो. यावर्षी जाने २००५ ते डिसेंबर २००६ या दोन वर्षातील पुस्तके विचारात घेण्यात आली. हे सात पुरस्कार यावर्षी खालील गटातील पुस्तकांना दिले गेले आहेत.

१. कविता. २. कादंबरी कथा, ३. आत्मकथन/आत्मचरित्र

**वैचारिक / समीक्षा / संशोधन :**
एखाद्या साहित्य प्रकाशात पुरस्कार योग्य साहित्यकृतीत आढळल्यास दुसऱ्या एखाद्या साहित्य प्रकाशातील पुस्तकाची निवड समिती पुरस्कारासाठी करू शकते. पुरस्कारप्राप्त ग्रंथांच्या प्रती महाराष्ट्रातील निवडक ५० ग्रंथालयांना भेट म्हणून पाठविल्या जातात. समाजाच्या सर्व थरात साहित्य प्रसार करणे हे मागचे उद्दिष्ट आहे.

**ललित वा वैचारिक नियतकालिक :**
अनियतकिलकांसाठी पुरस्कार मराठी साहित्य क्षेत्रात नियतकालिकांची प्रभावी परंपरा आहे. विचाराची देवाण घेवाण व जाणिवांचा विकास या दृष्टिने आधुनिक जगात नियतकालिकांना विशेष महत्त्व आहे. परंतु आज मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात गंभीर नियतकालिकांची स्थिती समाधानकारक दिसत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नियतकालिकांचे सांस्कृतिक महत्व ध्यानात घेऊन ध्येयनिष्ठ वृत्तीने मराठी नियतकालिके चालविणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी एका नियतकालिकाला रुपये२५००० व सन्मानचिन्ह या स्वरूपाचा पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारासाठी नियतकालिक / अनियतकालिकाचा विचार करता खालील बाबी विचारात घेतल्या जातात.

* ललित व वैचारिक साहित्य पुरस्कारासंदर्भात लेखकांकडून यापूर्वी नमूद केलेल्या अपेक्षांची पूर्ती जी नियतकालिके गंभीरपणे करीत असतील.

* जी शास्त्रीय दृष्टीने निःस्पृहपणे सत्याचे प्रकटन करण्याचे कार्य करीत असतील.

* ज्या नियतकालिकांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात काही विशेष महत्त्व प्राप्त झाले असेल किंवा त्यांच्या कार्यातून तसे आश्वासन मिळत असेल.

* ज्या नियतकालिकांद्वारे महाराष्ट्रातील विख्यात न नवोदित लेखकांच्या विचारांची देवाण होत असेल व त्यामुळे सांस्कृतिक दृष्ट्या जी महत्वाची ठरणारी असतील.

* या शिवाय ज्या अनियतकालिकांमध्ये भूमिकेचे गांभीर्य व प्रकाशनाचे सातत्य असेल अशा अनियतकालिकांचा विचार देखील या पुरस्कारासाठी करण्यात येईल.

* केशव गोरे स्मारक ट्रस्ट ने नियुक्त केलेली निवड समिती या पुरस्कारासाठी शिफारस करते

**रा. शं. दातार नाट्य पुरस्कार :**

नाटक या प्रकारासाठी २००३ सालापासून हा विशेष पुरस्कार महाराष्ट्र फाऊण्डेशनतर्फे दिला जात आहे. या वर्षापासून हा पुरस्कार एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक समस्येविषयी आशयसंपन्न नाट्यकृती सादर करण्यात मोलाचा वाटा असणाऱ्या नाट्यकर्मीसाठी देण्यासाठी योजना आहे. हा पुरस्कार प्रामुख्याने रंगभूमीवरील उभरत्या. तरुण नाट्यकर्मीसाठी आहे. या पुरस्काराचे स्वरूप रु. २५००० व सन्मानचिन्ह असे असून त्याची शिफारस करण्यासाठी केशव गोरे स्मारक ट्रस्ट तर्फे वेगळी त्रिसदस्य समिती नियुक्त करण्यात आली आहे.